# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः 14.03.2024** **वारःगुरुवार**

---

1.स्वातंत्र्यानंतर समान नागरी कायदा लागू करणारं उत्तराखंड देशातलं पहिलं राज्य, राष्ट्रपतींची कायद्याला मंजुरी,
2.भूतानचे पंतप्रधान पाच दिवसांच्या भारत दौऱ्यावर
3.पीबी शब्द या प्रसारभारतीच्या वृत्तसेवेचं उद्घाटन
4.लोकसभा निवडणुकीसाठी भाजपच्या दुसऱ्या यादीत नीतीन गडकरी, पियुष गोयल, अनुराग सिंग ठाकूर या केंद्रीय मंत्र्यांना उमेदवारी; आणि
5.ऑल इंग्लंड खुल्या बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेमध्ये भारताच्या लक्ष्य सेनचा उपउपान्त्यपूर्व फेरीत प्रवेश

**सनाका**
राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी समान नागरी कायदा उत्तराखंड विधेयक, 2024 ला मंजुरी दिली आहे. या मंजुरीमुळे स्वातंत्र्यानंतर समान नागरी कायदा लागू करणारं उत्तराखंड हे देशातलं पहिलं राज्य झालं आहे. बहुपत्नीत्व, बहुपतीत्व, हलाला, इद्दत आणि तलाक यासारख्या प्रथांवर या विधेयकात उपाय करण्यात आले आहेत. कोणताही भेदभाव न राहता सर्वांना मालमत्तेचे हक्क, समान विवाहयोग्य वय, समान वारसा हक्कांची खात्री, पोटगी, दत्तक आणि घटस्फोट यासाठी यात तरतूद करण्यात आली आहे. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंग धामी यांनी या विधेयकाला राष्ट्रपतींची मंजुरी मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केलं आणि या कायद्यामुळं राज्यातल्या सर्व नागरिकांना समान हक्क मिळतील आणि महिलांच्या पिळवणुकीला आळा बसेल असं सांगितलं.

**भूतान पंतप्रधान**
भूतानचे पंतप्रधान दाशो त्शेरिंग टोबगे आजपासून पाच दिवसांच्या भारत दौऱ्यावर येत आहेत. या वर्षी जानेवारी महिन्यात पंतप्रधानपदाची सूत्रं स्वीकारल्यानंतरचा त्यांचा हा पहिलाच परदेश दौरा आहे. या दौऱ्यादरम्यान ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतील आणि पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांच्याशी द्वीपक्षीय चर्चा करतील, अशी माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं दिली आहे. पंतप्रधान टोबगे मुंबईलाही भेट देतील. त्यांच्यासोबत भूतानच्या मंत्रिमंडळातले मंत्रिगण आणि वरिष्ठ सरकारी अधिकारीही भारतभेटीवर येणार आहेत. भारत आणि भूतान यांच्यातले संबंध मैत्रीपूर्ण आणि सहकार्याचे आहेत. सर्वच पातळ्यांवर या दोन देशांदरम्यानचं नातं विश्वास, सद्भावना आणि परस्पर सामंजस्यावर आधारित आहे. भूतानच्या पंतप्रधानांच्या भारतभेटीमुळे या भागीदारीच्या प्रगतीचा आढावा घेण्याची, तसंच ही भागीदारी अधिक बळकट करण्यासंबंधी चर्चा करण्याची संधी मिळेल, असं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**पंप्र-सुरज**
पंतप्रधान सामाजिक उत्थान आणि रोजगार आधारित जनकल्याण, अर्थात पीएम-सूरज योजनेसाठीच्या राष्ट्रीय पोर्टलचा आरंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल करण्यात आला. कमकुवत समुदायातल्या एक लाख उद्यमींना पत सहाय्यही त्यांनी यावेळी मंजूर केलं. तसंच दूरस्थ पद्धतीनं अनुसूचित जाती, मागास वर्ग आणि स्वच्छता कामगारांसह विविध वंचित गटातल्या सरकारी योजनांच्या लाभार्थींसोबत संवाद साधला. वंचित घटकांना प्राधान्य देण्यासाठी पंतप्रधानांनी दिलेल्या वचनबद्धतेचा समावेश पीएम-सूरज राष्ट्रीय पोर्टलवर करण्यात आला आहे. समाजातल्या सर्वाधिक दुर्बल घटकांचं पुनरुत्थान करण्याच्या उद्देशानं हा एक परिवर्तनात्मक पुढाकार आहे. देशभरातल्या 470 जिल्ह्यांमधून वंचित गटांमधले सुमारे तीन लाख सरकारी योजनांचे लाभार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

**भारी-उद्योग**
भारतामध्ये इलेक्ट्रिक वाहनांचा वापर गतिमान करण्यासाठी केंद्रीय अवजड उद्योग मंत्रालयानं इलेक्ट्रिक मोबिलिटी प्रोत्साहन योजना जाहीर केली आहे. या योजनेखाली चार महिन्यांकरिता एकंदर ५०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे आणि 1 एप्रिल ते जुलै या कालावधीत ती राबविण्यात येईल, असं मंत्रालयानं सांगितलं. या योजनेच्या अंतर्गत केवळ इलेक्ट्रिक दुचाकी आणि इलेक्ट्रिक तीन चाकी वाहनं प्रोत्साहनासाठी पात्र असतील.

यामध्ये ई-रिक्शा, ई-कार्ट्स आणि एल-5 स्वयंचलित वाहनांचा समावेश असेल. याखेरीज, प्रगत बॅटरींवर चालणारी इलेक्ट्रिक वाहनंच केवळ लाभांशासाठी पात्र असतील. या योजनेचा लाभ 3 लाख 72हजारांहून अधिक इलेक्ट्रिक वाहनांना मिळेल, असा मंत्रालयाचा अंदाज आहे.

**आबा**
माहिती आणि प्रसारणमंत्री अनुराग सिंह ठाकुर यांनी काल पीबी शब्द, अर्थात प्रसार भारती- शेअर्ड ऑडिओ-व्हिज्युअल फॉर ब्रॉडकास्ट डिसेमिनेशन या वृत्तसेवेची सुरुवात नवी दिल्ली इथं केली. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सुधारित संकेतस्थळांचं आणि न्यूज ऑन एआयआर या मोबाइल ॲपच्या सुधारित आवृत्तीचं

उद्घाटनही त्यांच्या हस्ते झालं. शब्द वृत्तसेवा पहिल्या वर्षासाठी मोफत असेल आणि 50 विभागांमध्ये, सर्व महत्त्वाच्या भारतीय भाषांमध्ये बातम्या पुरवेल, अशी माहिती ठाकुर यांनी यावेळी बोलताना दिली. देशातल्या माहिती आणि प्रसारण क्षेत्रासाठी हा दिवस ऐतिहासिक आहे. बातम्या एकत्र करणं आणि देणं या कामासाठी देशाच्या कानाकोपऱ्यांत आणि सर्व स्थानिक भाषांमध्ये एक व्यापक जाळं प्रसार भारतीनं गेल्या अनेक वर्षांमध्ये निर्माण केलं आहे. मोबाइलच्या आजच्या जगातही आकाशवाणी कालसुसंगत राहिली आहे आणि सरकारच्या योजना, तसंच धोरणांबद्दल जाणून घेण्यासाठीचा अचूक स्रोत म्हणून आकाशवाणीकडे पाहिलं जातं, असं प्रतिपादन ठाकुर यांनी केलं.

**हेलिकॉप्टर्स**

संरक्षण मंत्रालयानं 34 प्रगत हलक्या हेलिकॉप्टर्सच्या खरेदीसाठी हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडसोबत 8 हजार 73 कोटी रुपयांच्या दोन करारांवर काल स्वाक्षरी केली. या करारा अंतर्गत भारतीय लष्करासाठी 25, तर भारतीय तटरक्षक दलासाठी 9 हेलिकॉप्टर्स खरेदी करण्यात येणार असल्याची माहिती मंत्रालयानं दिली. यापैकी लष्करासाठीची हेलिकॉप्टर्स, शोध आणि बचाव, जवानांची ने-आण करणं, मालवाहतूक, तसंच संकटाच्या वेळी नागरिकांना बाहेर काढण्याच्या दृष्टीनं तयार केलेली आहेत. तर तटरक्षक दलांसाठीची हेलिकॉप्टर्स, समुद्री टेहळणी आणि अटकाव, शोध आणि बचाव, तसंच सामान आणि व्यक्तींची ने-आण करण्यासाठी सज्ज राहणार आहेत.

**भाजप-2री यादी**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपनं 72उमेदवारांची दुसरी यादी काल जाहीर केली. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री ठाकूर हे हिमाचल प्रदेशच्या हमीरपूर इथून, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितिन गडकरी नागपूरमधून, पियुष गोयल मुंबई उत्तर, तर डॉ. भारती पवार दिंडोरी मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात असतील. केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांना धारवाडमधून उमेदवारी देण्यात आली आहे. तर शोभा करंदलाजे बेंगळुरू उत्तर, भगवंत खुबा बिदरमधून निवडणूक लढवणार आहेत. हरियाणाचे माजी मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांना कर्नाल, तर केंद्रीय मंत्री कृष्ण पाल गुर्जर यांना फरीदाबादमधून उमेदवारी देण्यात आली आहे. बंगळूरू दक्षिण मधून तेजस्वी सूर्या निवडणूक लढवतील.

**फास्टॅग-**

फास्टॅगसाठी पेटीएमचा वापर करणाऱ्यांनी 15 मार्चच्या आधी वेगळ्या बँकेच्या फास्टॅगचा वापर करायला सुरुवात करावी, अशी सूचना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं जारी केली आहे. यामुळे राष्ट्रीय महामार्गांवर प्रवास करताना दंड भरणं किंवा दुप्पट शुल्क भरावं लागणं टाळण्यासाठी हे गरजेचं असल्याचं रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं म्हटलं आहे. पेटीएम पेमेंट्स बँकेवर भारतीय रिझर्व्ह बँकेनं लादलेल्या निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर 15 मार्चनंतर पेटीएम फास्टॅगच्या वापरकर्त्यांना या खात्यातली रक्कम रिचार्ज करता येणार नाही. मात्र, त्यांच्या खात्यातल्या शिल्लक रक्कमेतून या तारखेनंतरही पथकर भरता येणार आहे.

**मूत्र पिंड दिन**

आज जागतिक मूत्रपिंड दिन आहे. मूत्रपिंडाचं आरोग्य आणि त्याचे विविध आजार याबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी मार्चच्या दुसऱ्या गुरुवारी हा दिवस साजरा केला जातो. या वर्षी या दिवसाचा मुख्य विषय सर्वांसाठी आरोग्यपूर्ण मूत्रपिंड असा आहे. मूत्रपिंडाच्या गंभीर आजारांवर लक्ष केंद्रित करणं आणि विविध पातळ्यांवर या आव्हानांचा सामना करणं हा या विषयामागचा उद्देश आहे.

आरबीआय दंड

भारतीय रिझर्व्ह बँकेनं बँक ऑफ इंडियाला एक कोटी, ४० लाख, ७६ हजार रुपयांचा दंड रिझर्व्ह बँकेनं ठोठावला आहे. ठेवींवरचा व्याजदर, बँकांमधल्या ग्राहक सेवा, आगाऊ व्याजदर, CRILC आणि पत माहिती कंपन्यांचं सदस्यत्वासंबंधी रिझर्व्ह बँकेनं जारी केलेल्या सूचनांचं पालन न करणं आणि पत माहिती कंपनी नियम, २००६ तल्या तरतुदींचं उल्लंघन यामुळे बँक ऑफ इंडियावर ही कारवाई करण्यात आली आहे.

**बॅडमिंटन**

ऑल इंग्लंड खुल्या बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेच्या महिला दुहेरीत भारताच्या अश्विनी पोन्नाप्पा आणि तनीशा क्रस्टो यांनी उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. त्यांनी हाँगकाँगच्या जोडीचा २१-१३, २१-१८ असा पराभव केला. पुरुष एकेरीत प्रियांशू राजावत याला इंडोनेशियाच्या प्रतिस्पर्ध्याकडून पराभव पत्करावा लागला, तर लक्ष्य सेननं डेन्मार्कच्या मॅग्नस जोहान्सनला नमवून उपउपांत्यपूर्व फेरी गाठली.

**टेबलटेनिस**

सिंगापूरमध्ये सुरु असलेल्या सिंगापूर स्मॅश टेबलटेनिस स्पर्धांमध्ये भारताच्या शरथ कमलनं उपउपांत्यपूर्व फेरी गाठली. त्यानं डार्को जॉर्गीक याचा 8-11, 11-6, 11-8, 11-9 असा पराभव केला.

महिला दुहेरीमध्ये मात्र भारताच्या ऐहीका आणि सुतीर्था मुखर्जी या जोडीला पराभवाचा सामना करावा लागला.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.